# स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,

## जिल्हा परिषद, गोंदिया

## अंतर्गत वाहन भाडे तत्वावर लावणेकरीता अर्जाचा नमुना

**वाहन मालकाचे / वाहनधारकाचे / संस्थेचे नांव :-**______________________________

**पत्ता :-** ________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

**दुरध्वनी/ मोबाईल क्रमांक :-** ____________________

**वाहनाबाबतची माहिती :-**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार (टाटा सूमो अथवा तत्सम) | वाहन उत्पादन वर्ष | वाहन खरेदी वर्ष | वाहन क्रमांक | RC/ TC क्रमांक | वाहन सीट संख्या | पॅन कार्ड आहे काय? असल्यास नंबर | वाहनाचे इंन्श्युरेन्स आहे काय ? असल्यास नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | | |

वरील नमूद केल्याप्रमाणे व ऑनलाईनमधील BOQ मध्ये टाकण्यांत आलेल्या दराप्रमाणे आणि सोबत जोडलेल्या शासनाच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रकल्पास आवश्यक असलेल्या कालावधीसाठी भाडेतत्तवावर उपरोक्त वाहन उपलब्ध करुन देण्यांस मी तयार आहे.

**टिप :-**

१. एक किंवा एकापेक्षा जास्त वाहनाकरिता एकच दर BOQ मध्ये नमूद करावयाचा आहे. वेगळे दर नमुद करता येऊ शकरणार नाहीत. एकापेक्षा जास्त वाहन असल्यास निविदा फी व अनामत रक्कमेचा डि.डि. सुद्धा ऑनलाईनमध्ये टाकावा लागेल व कार्यालयात शेवटच्या दिनांक व वेळेच्या आत जमा करावे लागेल.

२. जमा करण्यांत आलेल्या कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतरच वाहन लावण्यांत येईल. त्याआधी वाहनांची तपासणी करण्यांत येईल. त्याकरिता कंत्राटदारास फोन अथवा ई-मेल करण्यांत येईल.

अर्जदाराची स्वाक्षरी____________________

नांव :- ____________________

# स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया

## वाहन भाडयाने वापरण्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. वाहन हे वाहनधारकाच्या/ वाहनमालकाच्या/ संस्थेच्या नावावर असणे आवश्यक आहे.

२. वाहन वाहतुक कार्यालयातर्फे वैध नोंदणीकृत व नुतणीकरण झालेले असावे आणि परवाना ग्राहय असावा (कर व विमा ग्राहय असावा) वाहनावरील विमा हा कॉम्प्रेसिव्ह पद्धतीचा असावा.

३. वाहन प्रदुषण मुक्त (पी.यु.सी.) असल्याचा ग्राहय दाखला वाहनासोबत नेहमी असावा.

४. वाहन डिझेलवर चालणारे असावे. वाहनाला लागणारे इंधन (डिझेल, तेल, ऑईल, इ.) वाहन मालकानेच पुरवावे.

५. वाहनासाठी चालक हा मालकाने शासन वाहन परवानाधारक नियुक्त केलेला असावा. वाहनाचा वापर आवश्यकतेनूसार गोंदिया व गोंदिया बाहेर करावा लागेल. उशीरापर्यंत वाहन वापरावे लागल्यास रात्रीकालीन भत्ता किंवा पर्यायी चालकाची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

६. वाहनाचा वापर कार्यक्षेत्रांतर्गत ग्रामीण भाग, डोंगराळ, अतिदुर्गम भागात सुद्धा होईल.

७. किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहनमालकाची जबाबदारी राहील व त्यासाठी किरकोळ दुरुस्तीकरिता एक दिवस व मोठया दुरुस्तीकरिता ३ दिवसात वाहन मालकास वाहनाची दुरुस्ती करुन घ्यावी लागेल. विहित कालावधीत देखभालीसाठी लागणारे फिल्टर, वंगण, मजुरी, इ. चा खर्च वाहन मालकास करावा लागेल. तसेच यासाठी झालेली कि.मी. धावसंख्या देयकात समाविष्ट होणार नाही.

८. वाहन नियमित सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी वाहन मालक व चालक यांच्यावर राहील. वाहन सुस्थितीत न आढळल्यास अथवा वाहन चालविण्यांस वाहन चालकाने नकार दिल्यास नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल (किमान रुपये ५००/- प्रती दिवसाप्रमाणे वसुली करण्यांत येईल.)

९. भाडयाने घेतलेले वाहन, मालकाचे अथवा चालकाचे अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास व त्यामुळे जि.प. व शासनाचे कामकाजावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारित कंत्राट ठरल्यानंतर जे प्रती दिवस दर येतील त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे रक्कम देयकातुन कापून घेण्यांत येईल. भाडयाचे दर सर्व खर्चासह राहतील. या संदर्भात उद्भावणाच्या कायदेशीर बाबी संबंधी वाहन मालक पुर्णतः जवाबदार राहील.

१०. वाहन चालक कामावर असतांना गणवेश पुरविण्याची जवाबदारी वाहन मालकाची राहील.

११. वाहन हे वाहन मालकाच्या मालकीचे असल्याने वाहन चालकाच्या सर्व नियमबाह्य वर्तनास वाहन मालक जबाबदार राहील. (गुन्हेगारी व कायदेशीर बाबीसंबंधी ).

१२. वाहन हे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही वाहन मालकाची/ चालकाची राहील. याकरिता १५ दिवसांनी वाहनांची देखरेख व तपासणी आवश्यक असल्यास कार्यालयाच्या सोयीप्रमाणे सुट्टी देण्यांत येईल. परंतु, त्याचे भाडे कपात करण्यांत येणार नाही. सदर कालावधीसाठी पर्यायी वाहनाची/ चालकाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील व याबाबत २४ तास अगोदर अवगत करणे आवश्यक राहील. वाहनावरील इंधन व दुरुस्ती वा वाहन चालकाचा खर्च (वेतन व प्रवासभत्ते), त्यांच्या राहण्याच्या सोयी वाहन मालकास करावे लागेल.

१३. करारनामा केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, गोंदिया, यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहील व ते वाहन मालकास बंधनकारक राहील.

१४. वाहन चालक वारंवार गैरहजर असणे, वाहन चालकाची असमाधानकारक वर्तणुक, वाहनाची निगा, इ. बाबत पर्यायी व्यवस्था मालकास करावी लागेल.

१५. वाहन मालकाने करारनाम्याचा अवधी संपण्यापूर्वीच या कार्यालयाला भाडयाने दिलेले वाहन कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता आपले वाहन काढून घेतल्यास त्या महिन्याचे त्यांचे मासिक देयक जप्त करण्यांत येईल.

१६. प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O.) यांचे नियमानूसार वाहनाची कागदपत्रे वाहनासोबत ठेवावे लागतील. ज्या अभावी प्रादेशिक परिवहन अधिकारी/ पोलीस यांनी वाहन थांबविल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहनाच्या कराबाबत (टॅक्स), विमा, इत्यादीबाबत वाहन मालक जबाबदार राहील.

१७. नियमांतर्गत आयकर, इतर तत्सम कर अनुज्ञेय असल्यास त्याचा भरणा करण्याची जबाबदारी ही संबंधीत वाहन चालक/ मालकाची राहील.

१८. रविवारी अथवा इतर सुट्टयांचे दिवशी सुद्धा आवश्यकतेनूसार वाहन वापरण्यांत येईल. त्या दिवशी चालक व वाहन नेहमीप्रमाणे कार्यालयीन वेळेच्या आत कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे.

१९. वाहन एका महिन्यात जास्त फिरल्यास ३००० कि.मी. च्या वर प्रती कि.मी. मागे येणारा दर हा निविदेमध्ये (ऑनलाईनमधील BOQ मध्ये) वेगळा दर्शविण्यांत यावा. वाहन दिनांक ०१ एप्रिल २०१४ नंतरचे उपलब्ध न झाल्यास जास्तीत-जास्त एक वर्षा अगोदरचे वाहन त्यांची सद्यस्थितीची तांत्रिक तपासणी करुन त्यांचा घेण्याबाबतचा विचार करण्यांत येईल. मात्र ते समितीवर बंधनकारक राहणार नाही.

२०. तुलनात्मक दृष्टीने नवीन वाहनास प्राधान्य देण्यांत येईल. वाहन परवाना असलेली पॅकबॉडी प्राधान्याने व सुस्थितीत वाहन घेण्यांत येईल.

२१. All India Permit असलेल्या वाहनास प्रथम प्राधान्य देण्यांत येईल.

२२. वाहनांवरील कॉम्प्रेसिव्ह विमा प्रमाणे वाहनाच्या धंदेवाईक वापरासाठी विमा लागू राहणार नाही. सर्व तऱ्हेच्या जोखमीसाठी वाहन मालक/ चालक जबाबदार राहील.

२३. वाहन भाडेतत्वावर देण्याबाबतची परवानगी घेण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील व जर याबाबतीत कायदेशीर अडचणी उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही वाहन मालक/ चालकाची राहील.

२४. वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचा अपघात झाल्यास त्याबाबतची नुकसान भरपाई, इ. ची जबाबदारी वाहन चालकाची/ मालकाची राहील.

२५. वाहन हे करारनामा झाल्यापासून १ ते ११ किंवा १ ते ८ महिने या कालावधीकरिता बांधील राहील.

२६. वाहनाचा प्रकार हा दरमहा ३००० कि.मी. किमान मर्यादेचा असेल व वाहनाचा वापर ३००० कि.मी. प्रती माह पेक्षा जास्त झाल्यास ३००० कि.मी. नंतरचा प्रती कि.मी. चा दर स्वतंत्रपणे BOQ मध्ये ऑनलाईनमध्ये नमूद करण्यांत यावा.

२७. वाहन हे करारनामा झाल्यापासून ठरलेल्या कालावधीपर्यंत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), स्वच्छ भारत मिशन(ग्रामीण), जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, यांचे अधिनिस्त राहील.

२८. निविदाबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकारी अध्यक्ष जिल्हा कार्यकारी समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, यांना राहतील.

२९. वाहन पुर्ण वेळ म्हणजे २४ तास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, कार्यालयात उपलब्ध राहील व आवश्यकतेनूसार वाहन चालकास वाहन चालविण्याचे बंधन राहिल. वाहन चालकास कार्यालयीन वेळेत कार्यालयातच उपस्थित राहायचे आहे. इतरत्र फिरताना दिसल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

३०. कंत्राट मंजुर झाल्यानंतर व वाहन अधिग्रहीत केल्यानंतर वाहन मालकास दर महिन्यास देयके जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, या कार्यालयाकडे लॉगबुक सोबत सादर करावे लागेल.

३१. कंत्राट मंजुर झाल्यानंतर भरण्यांत आलेली अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून रुपये १२०००/- (अक्षरी रुपये बारा हजार रुपये) जमा करण्यांत येईल व रु.१००/- च्या स्टँप पेपरवर करारपत्र लिहून द्यावे लागेल. स्टँप पेपरचा खर्च कंत्राटदारास करावा लागेल.

३२. वाहनावर शासनाचे निर्देशाप्रमाणे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, अंतर्गत योजनांचे प्रचार व प्रसिद्धी अंतर्गत स्टिकर्स चिकटविण्यांत येतील, हे वाहनधारकास बंधनकारक राहील. त्याचा खर्च या कार्यालया मार्फत करण्यांत येईल.

३३. वाहन चालक/ मालक कडून वाहन बंद करण्यांत आल्यास अनामत रक्कम रुपये १२०००/- (अक्षरी रुपये बारा हजार फक्त) जप्त करण्यांत येईल.

३४. नियमांतर्गत आयकर व इतर तत्सम कर अनुज्ञेय असल्यास त्याचा भरणा करण्याची जबाबदारी संबंधीत वाहन चालकाची/ मालकाची राहिल.

३५. सदर वाहनाच्या निविदेत नमूद करण्यांत आलेले प्रती वाहन रु.५०० व रु.१२०००/- चा डी.डी. दिनांक १८/०८/२०१७ ला सायंकाळी ०५.०० वाजेपूर्वी या कार्यालयास जमा करण्यांत यावे. अन्यथा आपण भरलेली निविदा रद्द करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

३६. भाडयाचे वाहन निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यापासून ११ महिने कालावधीपर्यंत घेण्याचे प्रस्तावित आहे. तत्पुर्वी वाहन बंद करावयाचे शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यावर किंवा शासनाकडून वाहन प्राप्त झाल्यावर भाडेतत्वावरील वाहन बंद करुन वाहन मालकाकडे परत पाठविण्यांत येईल. जर त्यानंतर वाहनाची आवश्यकता भासल्यास मुदतवाढ देण्यांत येईल.

३७. वाहन भाडयाने घेतलेल्या कालावधीत वाहनाचे कोणतेही नुकसान/ अपघात किंवा वाहनाचे अपघातामुळे प्राणहानी झाल्यास त्याबाबतची कोणतीही जबाबदारी जिल्हा परिषद किंवा शासन स्विकारणार नाही.

३८. वाहन व वाहन चालक यांची काही तक्रार प्राप्त झाल्यास वाहनाचे कंत्राट तात्काळ प्रभावाने रद्द करण्यांत येईल.

३९. एका वाहन मालकाची एकापेक्षा जास्त वाहने असल्यास सर्व वाहनांकरिता एकच दर नमुद करण्यांत यावे व सर्व वाहनांची कागदपत्रे अनुक्रमे (उदा. R.C., Road Tax, Insurance, इत्यादी) ऑनलाईनमध्ये जोडण्यांत यावे.

४०. निविदेतील कमी दर स्विकारल्यानंतर गाडीची प्रत्यक्ष पाहणी करुन वाहनाची तांत्रिक तपासणी करुनच गाडी भाडयाने घेण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यांत येईल.

४१. भाडयाने घेतलेले वाहन राज्य शासनाच्या निकषानूसार राहतील व सदरची अंमलबजावणी संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, गोंदिया, यांचे यंत्रणेखाली राहील.

४२. प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दाखविता/ दर्शविता रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, गोंदिया, यांचेकडे राखून ठेवण्यांत आले आहेत आणि निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

४३. सदर वाहनांची निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यांत येईल. तसेच निविदेसंबंधीत सर्व शुद्धीपत्रके, अटी व शर्ती, इत्यादी सदर वेबसाईटवर निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर पाहावयास मिळतील.

४४. जर वाहन देखभाल दुरुस्ती करीता देण्यांत आल्यास किंवा वाहनांचे चालक अनुपस्थित राहिल्यास पर्यायी व्यवस्था करुन देणे वाहन मालकास अनिवार्य राहील.

४५. वाहन मालकाची/ चालकाची कार्यालयीन दिवशी किंवा कार्यालयीन वेळेत दुसरीकडे वाहन देऊ नये.

४६. वाहनाचे देयकास कधी-कधी दीड ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कालावधीत सुद्धा वाहन मालकाने आपले वाहन कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर निर्भर न राहता स्वखर्चाने नियमितरित्या कार्यालयात ठेवावे लागेल व वाहन सुस्थितीत ठेवणे गरजेचे राहील.

**अध्यक्ष**
**जिल्हा कार्यकारी समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद गोंदिया**